# चागंले दिवस येतील




झाडं-पेडं जिवंत राहिली तर फुलं-फळं येतील
वाईट दिवस सरून पुन्हा चागंले दिवस येतील

बंद दाराआड जनता लपून नाही बसलीय
स्वतःच दारासमोर लक्ष्मण रेषा आखलीय

जीव जगवायचाय, फुका का मरायचं?
समाजाचं देणं मानून घरातच बसायचं

स्वातंत्र्याचा लढा द्यायचाय नुसतं घरात बसून
देशसेवा सेवा घडणार आहे फक्त अंतर राखून

थोडे दिवस बंद होवून ‘आझादी’चं महत्व कळेल
आताच बाहेर पडाल तर प्राण सोडून जाईल

थांबूया थोडं घरातच अडचण असली तरी
चागंले दिवस येतील जर राहिलात घरी

**- नरेंद्र प्रभू**
http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/